☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

## १४ लक्ष २४ हजाराचा दारूचा मुद्द्माल हस्तगत

दिनांक ०७/०७/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने दोन वेगवेगळया ठिकाणी नाकेबंदी लावुन अवैध दारू तस्करांच्या मुसक्या आवळुन एकुण **१४ लक्ष २४** हजाराचा मुद्द्माल हस्तगत केला आहे.

पोलीस स्टेशन पडोली परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहितीवरून एका महिंद्रा बोलेरो पिकअप वाहनास चौराळा येथे नाकेबंदी दरम्यान ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये अवैध रित्या दारूचा मुद्द्माल मिळुन आला. सदर वाहनात ३७ पेटया देशी दारू किं. ३,७०,०००/—रू, महिंद्रा बोलेरो वाहन क्र. एम.एच. ३४ बीजी ०४९४ किं. ४,००,०००/—रू आणि इतर साहीत्य असा एकुण **७,७४,४००/—रू** चा मुद्द्माल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन पडोली येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

दुसरीकडे चंद्रपुर शहर परिसरात स्थागुशा पथक पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहितीवरून महाकाली कॉलरी बंकर रोडवर नाकेबंदी करून एका महिंद्रा झायलो वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये ५०० निपा देशी दारू किं. ५०,०००/—रू, एक महिंद्रा झायलो वाहन क्रं. एम. एच.१२ एचएल ६०८२ किं. ६,००,०००/—रू असा एकुण ६,५०,०००/—रू चा मुद्द्माल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक, चंद्रपुर श्री.महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वात सफौ. पद्माकर भोयर, सफौ. पंडित, पोहवा. महेंद्र भुजाडे, पोहवा सुरेश, पोना. प्रकाश बल्की, पोना. संजय, पोना अनुप, पोशि. कुंदन बावरी, सतिश, जावेद, नितिन, प्रशांत नागोसे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————